# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com

जा.क्र. गो.वि./आस्था./२९७८/२०१८ दि. १२/१२/२०१८

**प्रति,**

मा. प्राचार्य/प्राचार्या,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये.

**विषय: - दिव्यांग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी व सवलती संदर्भात तातडीने कार्यवाही घेण्याबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, दिव्यांग विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सोयी व सवलती संदर्भात सर्व महाविद्यालयाच्या प्राचार्यांची बैठक दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजी दुपारी २.०० वाजता विद्यापीठाच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये दिव्यांगांना सोयी व सवलती उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याअनुषंगाने सर्व महाविद्यालयांनी दिनांक ४ डिसेंबर, २०१८ च्या बैठकीचे सोबत संलग्नित इतिवृत्ताचे अवलोकन करून त्यानुसार तातडीने कार्यवाही घ्यावी व घेतलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास विनाविलंब सादर करावा.

**(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)**
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

सहपत्र:- बैठकीचे इतिवृत्त

**प्रतिलिपी माहितीस्तव अग्रेषित:-**

१. मा. कुलगुरु यांचे स्वीय सहाय्यक, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
२. मा. प्र-कुलगुरू यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.
३. मा. विभाग प्रमुख, पदव्युत्तर शैक्षणिक विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचना क्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालित राज्य विद्यापीठ)

**(आस्थापना विभाग)**

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

दुरध्वनीक्र. ०७१३२-२२३१०४ email:- gondwanaesst@gmail.com


## उच्च शिक्षण संस्थामध्ये दिव्यांगाना सर्व प्रकारच्या सोयी व सवलती देण्याबाबत दिनांक ०४.१२.२०१८ रोजी दुपारी २.०० वाजता घेण्यात आलेल्या प्राचार्यांच्या बैठकीचे कार्यवृत्त.

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य यांची बैठक मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्र-कुलगुरू यांच्या उपस्थितीत दुपारी २.०० वाजता विद्यापीठाच्या सभागृहात घेण्यात आली. सुरवातीस उपस्थितांचे स्वागत करून बैठकीस सुरूवात करण्यात आली.

सदर बैठकीमध्ये शासन निर्णयानुसार दिव्यांगाना महाविद्यालयामध्ये सोयी व सवलती उपलब्ध करून देण्याबाबत चर्चा करण्यात आली. तसेच दिव्यांगांना सोयी व सवलती उपलब्ध करून देण्यासंदर्भात उच्च स्तरीय ३ बैठकी घेण्यात आलेल्या असुन सदर बैठकीमध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही घेण्याबाबत सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाव्दारे कळविण्यात आलेले होते. त्याअनुषंगाने मा. प्र-कुलगुरू यांनी सर्व संलग्नित महाविद्यालयाचा आढावा घेवून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करण्याबाबत सर्व प्राचार्यांना निर्देश दिले. तसेच खालील विषयाबाबत माहिती देऊन त्यासंदर्भात लवकरात लवकर कार्यवाही घेण्याच्या सुचना सुध्दा देण्यात आल्या.

**विषय क्र. १ :- सर्व संबंधित शिक्षकांच्या बैठकी घेऊन त्यांना याबाबतची माहिती देणे.**

- प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांच्या बैठका आयोजित करून दिव्यांगांची माहिती उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांना महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणे सोयीचे होईल त्यादृष्टीने प्रयत्न करून त्यांना आवश्यक ती साधने उपलब्ध करून देण्यात यावे. दिव्यांग विद्यार्थ्यांचे वर्ग घ्यावे. त्यांना नोट्स उपलब्ध करून द्याव्या, व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत अवगत करावे. असे निर्देश देण्यात आले.

**विषय क्र. २ :- स्वयंसेवक/दिव्यांग विद्यार्थ्यांची बैठक घेऊन स्वयंसेवकांना आवश्यक माहिती देऊन कामासाठी उद्युक्त करावे, तसेच दिव्यांगांना उपलब्ध योजनाची माहिती देणे.**

- यासंबधी महाविद्यालयामध्ये स्वयंसेवक व दिव्यांग विद्यार्थ्यांच्या बैठका आयोजित करणे. दिव्यांगांना शासनाच्या उपलब्ध योजनाची माहिती अवगत करून देण्याबाबत व प्रत्येक महाविद्यालयामध्ये ५० ते ६० स्वयंसेवक असावेत असे निर्देश देण्यात आले.

**विषय क्र. ३ :- दिव्यांगांना वापरता येऊ शकेल व उपलब्ध होईल अशी वेबसाईट तयार करणे.**

- सर्व महाविद्यालयांनी दिव्यांगांकरीता स्वतंत्र वेबसाईट तयार करावी. बेबसाईट तयार करतांना दिव्यांगांना सहज व सुलभपणे वेबसाईट वापरता येईल त्यादृष्टीने सर्व तांत्रिक बाबी पडताळून वेबसाईट तयार करण्याचे मा. प्र- कुलगुरू यांनी सर्व प्राचार्यांना निर्देश दिले.

**विषय क्र. ४ :- दिव्यांगांकरीता विकसीत करण्यात आलेली सॉफ्टवेअर उपलब्ध करणे.**

- दिव्यांगांकरीता विकसीत करण्यात आलेले सॉफ्टवेअर उपलब्ध करून देण्याबाबत निर्देश देण्यात आले.

**विषय क्र. ५ :- समान संधी सेल तयार करणे.**

- महाविद्यालयामध्ये समान संधी सेलची स्थापना करावी. समान संधी सेलमध्ये प्राचार्यांचा समावेश असावा. तसेच दिव्यांग विद्यार्थी व स्वयंसेवक यांचा सदस्य म्हणुन समावेश असावा असे निर्देशित केले.

**विषय क्र. ६:-दिव्यांग विद्यार्थ्यांना अडथळा विरहीत वातावरण निर्मीतीसाठी/भौतिक सुविधा तयार करण्याकरीता नियोजन करणे**

- दिव्यांगांना महाविद्यालयामध्ये विना अडथळा परिचालन होण्यासाठी रॅम्पची व्यवस्था करावी. दिव्यांग विद्यार्थ्यांना साठी स्वतंत्र शौचालयाची व्यवस्था करावी. तसेच दिव्यांगांना आवश्यक असलेल्या अन्य भौतिक सुविधांची निर्मिती करावी असे निर्देश देण्यात आले.

**विषय क्र. ७:- शैक्षणिक सुविधा उपलब्ध होण्यासाठी व्यवस्था निर्माण करणे.**

- दिव्यागांना महाविद्यालयामध्ये आवश्यक शैक्षणिक साधने उपलब्ध करून दयावे. दिव्यांगांना महाविद्यालयामध्ये शिक्षण घेणे सोयीचे हाईल याकरीता महाविद्यालयीन शिक्षकांना प्रशिक्षण दयावे, दिव्यांगांना नोटस उपलब्ध करून दयावे, परीक्षेमध्ये आवश्यक असलेल्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात. लेखनिस, मुल्यांकनामध्ये सुट, स्पेलींग मध्ये, व्याकरणामध्ये तसेच शासन निर्णयानुसार अन्य आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतचे निर्देश दिले.

**विषय क्र. ८:- इमारत बांधकाम करताना कलम ४४ नुसार सुविधा निर्माण करणे व कलम ४४ नुसार इमारतीचे बांधकाम केंद्र शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे असणे आवश्यक आहे.**

- महाविद्यालयांनी इमारतीचे बांधकाम करताना कलम ४४ नुसार सुविधा निर्माण कराव्यात. तसेच सध्या उपलब्ध असलेल्या इमारतीमध्ये सोई सुविधा निर्माण कराव्या. तसेच इमारतीचे बांधकाम हे शासनाच्या नॅशनल बिल्डींग कोडप्रमाणे असणे आवश्यक असुन त्याप्रमाणे कार्यवाही घेण्याचे निर्देश देण्यात आले.

**विषय क्र. ९:- अदांजपत्रकात दिव्यांगाकरीता ३% तरतूद करणे.**

- महाविद्यालयाच्या अदांजपत्रकात ३% तरतूद दिव्यांगांकरीता करावी असे निर्देश देण्यात आले आहे.

**विषय क्र. १०:-अनेब्लींग युनिट फॉर डिसेबल स्टुडंट युनिटची स्थापना करून ग्रंथालयामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५-१० संगणक उपलब्ध करून देणे.**

- महाविद्यालयामध्ये अनेब्लींग युनिट फॉर डिसेबल स्टुडंट युनिटची स्थापना करावी. तसेच महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ५-१० संगणक उपलब्ध करून दयावे. दिव्यांगांकरीता विविध सॉफ्टवेअर डाऊनलोड करून घ्यावे. असे निर्देश दिले.

**विषय क्र. ११:- दिव्यांगांकरीता सुगम्य पुस्तकालय असावे. सुगम्य पुस्तकालयामध्ये सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध करून दयावीत.**

- सर्व महाविद्यालयांनी दिव्यांगांकरीता सुगम्य पुस्तकालय निर्माण करावे. तसेच दिव्यांगांकरीता आवश्यक अशी सर्व प्रकारची पुस्तके सुगम्य पुस्तकालयात उपलब्ध करून दयावी. असे निर्देशित केले.

**विषय क्र. १२:- विद्यार्थ्यांचे कृतीसत्र (सेमीनार) आयोजित करणे.**

- दिव्यांग विद्यार्थ्यांचे सेमीनार आयोजित करून त्यांना शासनाच्या योजनांची माहिती दयावी. अशा सुचना देण्यात आल्या.

**विषय क्र. १३:- शासन निर्णयातील तरतूदीनुसार दिव्यांगांना ५% आरक्षण देणे.**

- सर्व महाविद्यालयांनी शासन निर्णयायातील तरतूदीनुसार दिव्यांगांना सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता व वसतिगृहातील प्रवेशाकरीता ५% आरक्षण दयावे, दिव्यांगांकरीता ५% जागा राखीव ठेवाव्यात असे मा. कुलगुरू यांनी सर्व प्राचार्यांना निर्देश दिले.

सर्व प्राचार्यांनी आपल्या महाविद्यालयांमध्ये दिव्यांगांना शासन निर्णयानुसार व युजीसी च्या योजनेनुसार सोयी व सुविधा उपलब्ध करून द्याव्या. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्पची व्यवस्था करावी, दिव्यांगांना समान संधी मिळावी यासाठी शासनाने दिलेल्या निर्देशाचे पालन करून आवश्यक त्या सुविधा दिव्यांगांना उपलब्ध करून देण्यात याव्या. दिव्यांगांचे २१ प्रकार असुन त्यांचे महाविद्यालयांनी सांख्यिकीय आराखडा तयार करून विद्यार्थी कोणत्या प्रकारच्या दिव्यांगामध्ये मोडतो तसे प्रवेशाच्यावेळी अर्जामध्ये नमुद करावे. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांच्या अपेक्षा काय आहे हेही अर्जामध्ये नमुद करावे. महाविद्यालयाची वेबसाईट तयार करावी, त्यामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचा सर्व डाटा असावा. शासनाच्या निर्णयानुसार दिव्यांगांना ५% आरक्षण देण्यात यावे. अंदाजपत्रकामध्ये दिव्यांगासाठी ३% तरतूद करावी. महाविद्यायामध्ये Disability सेंटर स्थापन करावे किंवा दिव्यांगांना मदत करण्याकरीता हेल्पग्रुप तयार करावे. महाविद्यालयात येतानां त्यांच्या मदतीसाठी एक मदतनीस महाविद्यालयामध्ये असावा. तसेच सर्व महाविद्यालयांनी ३ डिसेंबर हा दिवस जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा करावा. त्यासाठी सेमीनार आयोजित करावे. त्यासाठी महाविद्यालयांनी सुरूवात करावी व दिव्यांगांना सर्व सोयी व सवलती उपलब्ध करून द्याव्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास लवकरात लवकर सादर करावा, असे मा. कुलगुरू महोदयांनी सर्व प्राचार्यांना निर्देश दिले.

तद्नंतर सर्व उपस्थितांचे उपकुलसचिव, प्रशासन विभाग यांनी आभार मानून बैठक समाप्त करण्यात आली.

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
**कुलसचिव**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

प्रत:-

१. **मा. कुलगुरूंचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना समादराने माहितीस्तव.**
२. **मा. प्र-कुलगुरू कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना समादराने माहितीस्तव.**
३. **विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांचे सर्व प्राचार्य यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.**